# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-19.06.2026** **वार- शुक्रवार**

---

**पंतप्रधान**

पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजनेअंतर्गत, 2 हजार 400 कोटी रुपयांच्या प्रोत्साहनपर निधीच्या वितरणाचा कार्यक्रम आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत होत आहे. देशातल्या 200 ठिकाणी या कार्यक्रमाचं प्रक्षेपण होत असून, पुण्यातल्या चार ठिकाणांचा यात समावेश आहे.

**योगदिन**

पुणे महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने, 21 जूनला, स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर, 'आंतरराष्ट्रीय योग दिना'च्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयं, सेवाभावी शैक्षणिक संस्था, क्रीडा संकुलं, क्रीडा मंडळं, क्रीडा संघटना, युवक मंडळं, महिला मंडळं तसंच क्रीडा क्षेत्रात कार्यरत संस्थांनी अधिकाधिक लोकसहभागासह आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमांचं आयोजन करावं असं आवाहन, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केलं आहे.

**योगदिन-पुणे**

बाराव्या योगदिनानिमित्त केंद्रीय संचार ब्यूरो, पुणे कार्यालय, आयुष मंत्रालय, पुणे महानगरपालिका आणि राष्ट्रीय निसर्गोपचारसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने, शनिवार वाड्यात, 21 आणि 22 जून रोजी, माहिती आणि चित्र प्रदर्शनाचं तसंच सामान्य योग प्रात्यक्षिकाचं आयोजन करण्यात आलं आहे. "निरोगी वार्धक्यासाठी योग" ही यंदाच्या योग दिनाची संकल्पना आहे.

**पिंपरी-चिंचवड-वृक्षतोड**

पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृत वृक्षतोड रोखण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात यावी, तसंच मंजूरी देण्यात आलेल्या वृक्षतोड प्रकरणांतील पुनर्रोपणाची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात यावी, असे आदेश पिंपरी चिंचवड शहराचे महापौर रवी लांडगे यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत. भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ, हरित आणि पर्यावरणपूरक शहर घडविण्याचा संकल्प असल्याचे महापौर लांडगे म्हणाले.

**पुरंदर विमानतळ**

पुरंदर येथील, प्रस्तावित छत्रपती संभाजी राजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या महसुली, न्यायिक आणि अर्धन्यायिक स्वरूपाच्या प्रलंबित अडचणी सोडविण्यासाठी २२ जूनला, सकाळी ११ वाजता सासवड प्रांत कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष शिबिर आयोजित करण्यात आलं आहे. या शिबिरात, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन जागेवरच निपटारा करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**मेट्रो**

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गावरील माण ते आर. के. लक्ष्मण संग्रहालय या सुमारे १३ किलोमीटर अंतरातील १२ स्थानकांचे काम जूनअखेरपर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती 'पुणे आयटी सिटी मेट्रो रेल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल कुमार सैनी

यांनी आज दिली. मात्र, या मार्गाच्या उद्घाटनाचा आणि प्रवासी सेवा सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकार घेणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**वाहतूक बदल**

कात्रज चौक ते राजस सोसायटी दरम्यान सुरू असलेल्या सहापदरी उड्डाण पुलाच्या कामामुळे या मार्गावरील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आल्याबाबतचे आदेश वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी जारी केले आहेत, त्यानुसार, कोंढवा ते कात्रज येथे जाणाऱ्या वाहनांनी राजस पुलाऐवजी सेवा रस्त्याचा वापर करावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

**सिंहगड स्वच्छता मोहीम**

छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीचे औचित्य साधून सारथी संस्थेच्यावतीने सिंहगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सारथीचे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी तसेच सारथी पुणे विभागीय कार्यालयाचे उपव्यवस्थापकीय संचालक अनिल पवार व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

**मानव्य-वर्धापनदिन**

एड्स संसर्गित मुला-मुलींचे संगोपन करत, त्यांना आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने, स्वर्गीय विजयाताई लवाटे यांनी स्थापन केलेल्या, 'मानव्य' संस्थेचा २९ वा वर्धापनदिन रविवारी, 21 जूनला, संस्थेच्या भुगाव मधील 'गोकुळ' या वास्तुत संपन्न होणार आहे. याप्रसंगी 'पोस्ट कार्ड अँड लायब्ररी मॅन ऑफ इंडिया'अशी ओळख असलेले प्रदीप लोखंडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, याप्रसंगी संस्थेच्या सौरउर्जा प्रकल्पाचे उद्घाटन होणार आहे.

**नशामुक्त भारत**

दारु तसंच अंमली पदार्थांसह समाज माध्यमांचंही व्यसन घातक आहे, त्यामुळे, विद्यार्थ्यांनी अशा व्यसनांपासून दूर राहावं असं आवाहन राज्याच्या समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे यांनी यांनी केले. नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत आंतरराष्ट्रीय मादक पदार्थाचा गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधी दिनानिमित्त, येरवड्यातील, सफाई कामगारांच्या शासकीय निवासी शाळेत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

**पिंपरी-चिंचवड पाणीकपात**

पिंपरी चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणात केवळ १९ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर, पिंपरी चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात करण्याच्या सूचना पुणे पाटबंधारे विभागाने पिंपरी चिंचवड महापालिकेला दिल्या आहेत. यानुसार, आजपासून ही पाणीकपात लागू करण्यात आली आहे. नागरिकांनी पाण्याचा जपून आणि काटकसरीने वापर करावा, असं आवाहन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केलं आहे.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज दुपारनंतर आभाळ काहीसं ढगाळ होतं. आज कमाल तापमान 36 तर किमान 23 अंश सेल्सियसची नोंद करण्यात आली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**